# नाशिक महानगरपालिका,नाशिक
## जाहिरात व परवाने विभाग
राजीव गांधी भवन(मुख्यालय), शरणपुररोड नाशिक -४२२ ००२

✉ – dmc_ lic@nmc.gov.in ✆ (०२५३)२२२२४७६


जाक्र.जापवि/कक्ष-१/ २८४ /२०२५ दिनांक :-२८/०८/२०२५

**विषय** :- श्री गणेशोत्सव, नवरात्रौत्सव व इतर सार्वजनिक उत्सवा प्रसंगी सार्वजनिक ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात मंडप/स्टेज कमान उभारण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ** :- १. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१७३/२१० श्री महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन.

२. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक याचिका २०१५/सं क्र.८७८(१)/नवि-३४ दि.०६/०७/२०१५

३. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक याचिका २०१५/सं क्र.८७८(२)/नवि-३४दि.०६/०७/२०१५

४. मा. महासभा, ठराव क. ६९३ दि.१७/१०/२०१५

५.महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक ३ न्याया २०१६ / क्र. १२७/ (भाग-१) /नवि-१७ दि. १९/११/२०१६

६.महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र याचिका-२०१८/प्र.क्र.२५३/ नवि-१७ दि. १९/०९/२०१९

७.मा. आयुक्त यांचे कडील जा.क्र./जापवि/कक्ष-१/४३२/२०२० दि.०७/०७/२०२० रोजीचे परिपत्रक.

---

**आदेश**

वरील विषयांन्वये व संदर्भिय आदेश परीपत्रकांन्वये श्री गणेशोत्सव, नवरात्रौत्सव व इतर सार्वजनिक उत्सवा प्रसंगी सार्वजनिक ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात मंडप/स्टेज कमान उभारण्यास परवानगी देणेचे संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१७३/२१० श्री महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये मा. न्यायालयाने दिनांक १०/०८/२०१६, रोजी ओदश दिलेले आहेत. सदर मा. न्यायालयाचे आदेशांच्या अनुषंगाने, राज्य शासनाने संदर्भिय आदेश क्र.२,३,५ व ६ अन्वये मार्वजनिक उत्सवाकरिता सार्वजनिक ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात मंडप उभारणे बाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.४ व ७ अन्वये याबाबत धोरण निश्चित केलेले आहे. त्यानुसार सन २०२५या वर्षा श्री गणेशोत्सव, नवरात्रौत्सव व इतर सार्वजनिक उत्सवा प्रसंगी सार्वजनिक ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात मंडप/स्टेज कमान उभारण्यास परवानगी देण्याची कार्यवाही करतांना खालील बाबी विचारात घेतल्या जातिल:

१. नाशिक महानगरपालिकेतर्फे सार्वजनिक उत्सव प्रसंगी मंडप परवानगीच्या सुलभ प्रक्रियेसाठी' ऑनलाईन परवानगी राबविण्यात येईल.
२. मंडप परवानगीसाठी सार्वजनिक मंडळांना महानगरपालिकेच्या http://nmcfest.nmc.gov.in या वेब साईडवर ऑनलाईन अर्ज करता येईल.
३. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांन्वये मंडप उभारणी करणेकरीता रस्त्यांवर खड्डे न होण्याची दक्षता घेणे आवश्यक आहेत तसेच मंडप व कमानी उभारणी करतांना खांब रोवण्यासाठी वाळूच्या ड्रमचा वापर करावा. मंडपापासून १५ मीटरपर्यंत विदयुत रोषणाई करता येईल.
४. वाणिज्य स्वरुपाच्या जाहिरातीस कर लागू आहे.

५. दुर्घटना घडू नये, यासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी लागेल. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक
उपाययोजना करण्यात याव्यात. नोंदणीकृत कंत्राटदाराकडून विद्युत विषयक कामे करुन घेण्यात यावीत.

६. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक अथवा आजारी व्यक्तींना ध्वनीक्षेपक यंत्रणेचा त्रास होऊ नये या करीता संदर्भ क्र.२ अन्वये ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० ची अंमलबजावणी करुन दक्षता घ्यावी.

७. मंडप परवानगी देणारे प्राधिकृत अधिकारी म्हणून मनपाच्या सर्व विभागीय अधिकाऱ्यांनी, डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन या जनहित याचिकेसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे व शासन परिपत्रकांचे तंतोतंत पालन करणे अनिवार्य राहील.

**सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी मंडप परवानगीची सविस्तर कार्यप्रणाली पुढिलप्रमाणे राहील -**

**१) अर्ज सादर करणे :-**

१. मंडप परवानगीसाठी सण / उत्सवाच्या ३०दिवस अगोदर फक्त ऑनलाईन अर्ज करता येईल.

२. मंडप उभारणी परवानगीसाठी विहीत नमुन्यात महापालिकेच्या http://nmcfest.nmc.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावयाचा आहे.

३. उत्सव सुरु होण्याच्या दिनांकाच्या ७ दिवस अगोदरपर्यत ऑनलाईन परवानगी देण्यात येईल.

**२) परवानगीकरीता आवश्यक बाबी:-**

१. अर्जदाराचा संपूर्ण पत्ता (पुराव्यासह) मोबाईल क्रमांक, आधारकार्ड, ई-मेल व हमीपत्र.

२. सार्वजनिक मंडळाचा पत्ता आणि पदाधिकारी/सदस्यांची यादी व दूरध्वनी क्रमांक.

३. मंडपाचा स्थळदर्शक नकाशा.

४. पोलीस विभागाची सहमती.

५. वाहतूक पोलीसांची सहमती.

६. अग्निशमन विभागाचा दाखला.

**३) परवानगीची कार्यवाही :**

१. मनपा. विभागीय कार्यालया मार्फत अर्जाची छाननी करण्यात येईल.

२. छाननीअंती नाकारलेल्या अर्जाची कारणे अर्जदारास कळविण्यात येतील.

३. स्थानिक पोलीस, शहर वाहतूक व अग्निशमन विभागाने मंडळाचा अर्ज प्राप्त झाल्यावर प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन संमती/ना-हरकत पत्र तयार करुन Online वर Upload करतील.

४. मनपा बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यानी प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन स्थळ निरिक्षण अहवाल, जागेचे रेखांकन व जीपीआरएसद्वारे फोटो अपलोड करावयाचा आहे.

५. तद्नंतर अर्जदारास मंडप शुल्क भरणे बाबत ऑनलाईन कळविल्यानंतर त्याचा भरणा अर्जदाराने मुदतीत ऑलाईन करावयाचा आहे.

६. वरिल पूर्तता झाल्यानंतर संबधीत विभागाचे विभागीय अधिकारी तीन दिवसात परवानगी पत्र तयार करुन Online वर Upload करतील.

**४) सर्वसाधारण निकष :-**

१. मंडप उभारणीमुळे वाहतूक सुरळीत राहील व नागरिकांना येण्या-जाण्यासाठी अडथळा निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी.

२. रेल्वेस्थानक, बसस्थानक, मुख्य ऑटो रिक्षा स्टँड, प्रमुख हॉस्पिटल्स व शैक्षणिक संस्था अशा गर्दीच्या व वर्दळीच्या ठिकाणी मंडप उभारण्यास परवानगी दिली जाणार नाही.

३. मंडप टाकण्याची परवानगी म्हणजे रस्ता खोदण्याची परवानगी नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-२३९ अन्वये रस्ता खोदण्याबाबतच्या निर्बंधाचे पालन करुन, विनापरवानगी खड्डा खोदल्यास नियमानुसार दंड आकारण्यात येईल. तसेच मंडप हटविल्यानंतर रस्ता पूर्ववत करावा.

४. रस्त्यावरील वाहतूक सुरळीत राहील, तसेच चौकामध्ये वाहने वळविणे शक्य होईल अशा रितीने मंडपाची जागा निश्चित करणेत यावी.

**५) 'कमान' उभारण्याचे निकष :-**

१. प्रत्येक मंडळास मंडपाच्या आवारात २ कमानींची परवानगी देता येईल.

२. वाहतुकीस व नागरिकांना येण्याजाण्यास अडथळा होईल, अशा रितीने कमान उभारता येणार नाही. कमानीची उंची कमीत कमी २२ फूट असावी.

३. कमान टाकण्याची परवानगी, म्हणजे रस्ता खोदण्याची परवानगी नाही.

४. वाळूच्या ड्रममध्ये लाकडी बांबू टाकून कमान उभारता येईल. तसेच कमान हटविल्यावर रस्ता पूर्ववत करावा. विनापरवानगी खड्डा खोदल्यास नियमानुसार दंड भरणे बंधनकारक राहील.

५. कमानीवर व मंडप आवारात तात्पुरत्या स्वरुपात वाणिज्य जाहिरात करावयाची असल्यास, महाराष्ट्र

६. महानगरपालिका अधिनियम कलम-२४५ अन्वये, विहीत शुल्क भरुन विभागीय अधिकारी यांचेकडून वेगळी परवानगी घ्यावी.

**६) ध्वनी प्रदूषणाचे निकष :-**

१.लाऊडस्पिकरसाठी पोलीस विभागाकडून स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक राहील.

२. रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये, धार्मिक ठिकाणे किंवा सक्षम प्राधीकरणाने घोषित केलेल्या अन्य कोणत्याही शांतता क्षेत्रात (सभोवतालच्या १०० मीटर पर्यंत) मंडपास परवानगी देण्यात येणार नाही.

**७) शुल्क आकारणी :-**

१. सार्वजनीक गणेशोत्सव स. न.- २०२५ करीता तात्पुरत्या स्वरुपात मंडप/स्टेज कमान उभारण्यास कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही.

२. महानगरपालिकेच्या नियमानुसार बॅनर व होर्डीग करीता जाहिरातीचे स्वतंत्र दर आकारण्यात येतील.

**८) तक्रार निवारण :-**

१. नागरिकांना खालील क्रमांकावर विना परवानगी मंडप व ध्वनी प्रदूषणाची तक्रार नोंदविता येईल.

| अ.क्र. | पदनाम | कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | विभागीय अधिकारी नाशिक पुर्व | ०२५३-२५९७९८२ |
| २ | विभागीय अधिकारी नाशिक पश्चिम | ०२५३-२५८२३४८ |
| ३ | विभागीय अधिकारी पंचवटी | ०२५३-२५१२३५३ |
| ४ | विभागीय अधिकारी नाशिक रोड | ०२५३-२४६०२३४ |
| ५ | विभागीय अधिकारी नविन नाशिक | ०२५३-२३९०७३९ |
| ६ | विभागीय अधिकारी सातपुर | ०२५३-२३५०३६७ |

२. ध्वनी प्रदूषण व विनापरवानगी मंडप/स्टेज तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येईल. प्राप्त झालेली तक्रार कार्यवाहीसाठी संबंधित विभागीय अधिकारी, पोलिस स्टेशन व पोलिस कंट्रोल रुमला अग्रेषित करण्यात येईल.

३. पोलीस विभागामार्फत ध्वनी प्रदूषण नियम २००० नुसार उचित कारवाई करण्यात येईल.

४. विभागीय कार्यालयातील अतिक्रमण विभागामार्फत अनधिकृत मंडप तातडीने हटविण्यात येईल.

## ९) सर्वसाधारण अटी :-

१. परवानगीचा अर्ज दाखल केला, याचा अर्थ परवानगी मिळाली असे नव्हे. मंडळाने लेखी परवानगी मिळाल्यानंतरच मंडप उभारणीचे काम सुरु करावे.

२. मंडपाच्या दर्शनी भागावर परवानगीपत्र प्रदर्शित करणे अनिवार्य राहील. तसे न केल्यास मंडप अनधिकृत समजला जावून तो काढून टाकण्याची कारवाई करण्यात येईल.

३. मंडपाच्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण महामंडळाकडून नियमानुसार विदयुत जोडणी घेण्यात यावी. विदयुत पुरवठा घेतेवेळी वायरिंगमध्ये जोड खुला राहणार नाही, या करीता सर्व विदयुत कामे परवानाधारक ठेकेदारामार्फत योग्य प्रकारे करावीत.

४. आग प्रतिबंधक साधने व प्रथमोपचाराची साधने(एम्युलन्स) तात्काळ उपलब्ध होतील अशा प्रकारे ठेवावीत. मंडपाच्या ठिकाणी प्रत्येकी २०० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या २ टाक्या तसेच बारीक वाळूने भरलेल्या २ बादल्या भरुन ठेवणे आवश्यक आहे.

५. मंडप उभारतांना अग्निशमन दलाची वाहने अत्यावश्यक घटनेच्या वेळी मंडपाजवळ जाऊ शकतील, अशां प्रकारे मोकळी जागा ठेवण्यात यावी.

६. मंडपातून निघालेला ओला व सुका कचरा वर्गीकरण करुन, तसेच बंद डब्यात निर्माल्य ठेवून त्याची विल्हेवाट लावण्याची आणि उत्सव मंडप व आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी सार्वजनिक मंडळाची राहील.

७. मंडपापासून विदयुत तार व डी पी बॉक्स ६ फूट अंतरावर ठेवणे मंडळावर बंधनकारक आहे. तसेच विदयुत रोषणाई मंडपापासून जास्तीत जास्त १५ मिटर अंतरापर्यंत करता येईल.

८. मंडपाच्या प्रवेशद्वारावर महानगरपालिकेने दिलेले परवानगी व अग्निशमन विभागाकडील ना हरकतीचे पत्र प्रदर्शित करणे बंधनकारक आहे.

९. कोणाच्याही जातीय/धार्मिक भावना दुखावल्या जाऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे बॅनर, देखावे किंवा फलक मंडपामध्ये किंवा बाहेरील बाजूस लावू नयेत.

१०. परवानगीधारकांनी त्यांना निश्चित करुन दिलेल्या आकारमानाचा मंडप उभारणे बंधनकारक राहील.

११. ध्वनीप्रदूषण विषयक कोणत्याही बाबींचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. उत्सव कालावधीत ध्वनी प्रदूषणाच्या विहीत मर्यादा पातळीच्या निकषांची अंमलबजावणी करावयाची आहे. तसेच यासंदर्भात पोलीस

१२. विभागामार्फत ठरवून दिलेल्या वेळेचे बंधन पाळण्याची दक्षता घ्यावयाची आहे.

१३. उत्सव संपल्यानंतर परवानगी अर्जामध्ये नमूद केलेल्या तारखेनंतर सार्वजनिक मंडळाने स्वतःहून मंडप काढून घ्यावा. अन्यथा दंड आकारण्यात येईल.

१४. मा. उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत महसूल विभागातील अधिकाऱ्यांना उत्सवाच्या ७ दिवस अगोदर मंडप तपासणीचे निर्देश दिलेले आहेत. मंडप तपासणी पथकास मंडळाच्या जबाबदार व्यक्तीने परवानगीपत्र दाखवून विचारण्यात आलेली माहिती पुरविणे आवश्यक राहील.

१५. उत्सवाच्या दरम्यान जमा होणाऱ्या निर्माल्यावर केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मध्ये नमूद तरतुदीनुसार संबंधित मंडळ/अर्जदार/संस्था यांनी कार्यवाही करावी.

१६. सण/उत्सव कार्यक्रम संपल्यावर तात्काळ मंडप/तत्सम बांधकाम तात्काळ काढण्याची जबाबदारी संबंधीत मंडळ/अर्जदार/संस्था यांची असेल.

## १०) शास्ती :-

१. महानगरपालिकेची परवानगी मिळण्यापूर्वी टाकण्यात येणारे मंडप/कमान है विनापरवानगी समजण्यात येतील. मंडप टाकणे हे विकास कामात अंतर्भूत होत असल्याने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम

१९६६ च्या कलम ५४ अन्वये नोटीस देवून हटविण्याची कारवाई करण्यात येईल. तसेच संबधितांविरुध्द सदर कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात येईल.

२. जाहिरातीमुळे परिसर विद्रुप होणार नाही याची दक्षता संबंधित विभागीय अधिकारी यांनी घेणे बंधनकारक राहील तसेच विनापरवानगी जाहिरात लावल्यास, सदरची जाहिरात काढण्यात येऊन, महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध अधिनियम १९९५प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येईल.

३. मंडप/कमानी उभारतेवेळी विना परवानगी रस्त्याची खोदाई केल्यास, नियमानुसार दंड आकारणी करण्यात येईल.

४. महानगरपालिकेच्या विदयुत पोलवरुन विदयुत जोडणी घेतल्यास, मंडळाचे पदाधिकाऱ्यांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

उपरोक्त अटी शर्ती तसेच मा. उच्च न्यायालयाचे निर्देशांचा भंग केल्यास, देण्यात आलेली मंडप परवानगी रद्द करून, अशा मंडळांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. व सदरील कालावधीत मा.न्यायालया कडुन व राज्य शासनाकडून वेळोवेळी प्रसिध्द करणेत येणाऱ्या आदेशाचे पालन करणे सार्वजनीक गणेशउत्सव मंडळास बंधनकारक राहिल.

(मनिषा खत्री भा.प्र.से)
**आयुक्त तथा प्रशासक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.**

**प्रत माहिस्तव सादर :-**

१. मा. जिल्हाधिकारी, नाशिक.
२. मा. पोलिस आयुक्त, नाशिक शहर
३. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक.
४. अति. आयुक्त (१) मनपा,नाशिक.
५. अति. आयुक्त (शहर) मनपा,नाशिक.
६. अति. आयुक्त (सेवा) मनपा,नाशिक.
७. शहर अभियंता, मनपा, नाशिक.

**प्रत कार्यवाहीस्तव सादर :-**

१. उप आयुक्त, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मनपा, नाशिक.
२. उप आयुक्त अतिक्रमण, मनपा, नाशिक.
३. मुख्य अग्निशमन अधिकारी, मनपा नाशिक.
४. कार्यकारी अभियंता, विद्युत, मनपा नाशिक.
५. सर्व विभागीय अधिकारी मनपा, नाशिक.